**संच : क**

# शिक्षकांसाठी सूचना          दुसरी : मराठी

## पायाभूत चाचणी : २०१७-१८

**इयत्ता – दुसरी**

**विषय : मराठी**

**लेखी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना**          **एकूण गुण : २०**

**प्रश्न १) शब्द ऐकून लिही.** (गुण ५)

**क्षेत्र** : लेखन (श्रुतलेखन)

**उद्‌दिष्ट :** जोडाक्षरविरहित स्वरचिन्हयुक्त शब्द लिहिता येतात का हे तपासणे.

**सूचना :**
- यादीतील शब्द सांगताना मोठ्याने वाचावा. शब्दाचा अर्थ लक्षात यावा म्हणून शब्द सलग वाचावा.
- मग २ सेकंद थांबून शब्द पुन्हा वाचावा.
- मुलांचा शब्द लिहून झाल्यावर त्याला शब्द तपासण्याची सूचना देऊन शब्द पुन्हा एकदा वाचावा.

**शब्द :**

| | |
|---|---|
| १) साधा | २) शिरा |
| ३) चतुर | ४) केर |
| ५) बैल | ६) कोठार |
| ७) गौरी | ८) वंदन |
| ९) बॅट | १०) बॉल |

**गुणदान : प्रत्येक योग्य शब्दास अर्धा गुण याप्रमाणे गुणदान करावे.**
हा प्रश्न तपासताना खालील बाबी लक्षात घ्याव्यात. शब्द सलग लिहिला असेल व लेखननियमांनुसार बरोबर असेल तरच गुण द्यावेत. उदा. 'शिरा' ऐवजी 'शीरा' किंवा 'बैल' ऐवजी 'बईल'असे लिहिल्यास गुण देऊ नयेत.

**प्रश्न २) दिलेल्या अक्षरांपासून कोणतेही पाच अर्थपूर्ण शब्द बनव.** (गुण ५)
- दिलेल्या अक्षरांचाच वापर अपेक्षित.
- शब्द अर्थपूर्ण असावेत.
- उदा. सरी, काम, कास, मका, रीत इत्यादी.
- प्रत्येक अचूक शब्दास एक गुण द्यावा. ('नात' या शब्दासाठी गुणदान करू नये.)

**प्रश्न ३) चौकटीत लपलेल्या कोणत्याही पाच प्राण्यांची नावे शोधून लिही.** (गुण ५)
आडव्या व उभ्या रचनेत लपलेली नावे शोधणे अपेक्षित.
उदा. हरिण, सिंह, ससा, लांडगा, वाघ इ.
यापैकी कोणत्याही पाच अचूक उत्तरास गुणदान करावे. ('हत्ती' या शब्दासाठी गुणदान करू नये.)



*Runa Graphics : Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 2/Sanch-C/ Proof -II/19-06-2017/G*

# संच : क

**प्रश्न ४) पुढील चित्रांतील मुलं काय करत आहेत ते लिही.** (गुण ५)

**क्षेत्र :** स्व-अभिव्यक्ती (लेखी)

**उद्‌दिष्ट :** स्वत:च्या शब्दांत लिहिता येते का हे तपासणे.

**गुणदान :** प्रत्येक चित्राच्या योग्य उत्तरास एक गुण द्यावा.

- चित्रात दिसणाऱ्या क्रियेचे वर्णन पूर्ण वाक्यात असेल तरच गुण द्यावेत.
- उदा. मुलगी आहे, वही आहे अशा वाक्यांना गुण देऊ नयेत. 'मुलगी वहीत चित्र काढते/काढत आहे.' 'मुलगी मोबाईलवर मेसेज वाचते/वाचत आहे.' यांसारखी वाक्ये पूर्ण क्रिया दर्शवितात. अशा पूर्ण क्रिया दर्शविणाऱ्या वाक्याला एक गुण द्यावा. (स्थानिक भाषा स्वीकारावी. तसेच मोबाईलसारख्या अन्य साधनांचा उल्लेख केल्यास तो मान्य करावा.)
- येथे मुलांनी लेखन नियमांनुसार लिहिणे अपेक्षित नाही.



**Runa Graphics :** *Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 2/Sanch-C/ Proof -II/19-06-2017/G*

**संच : क**

**तोंडी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना** **एकूण गुण : १०**

**तोंडी प्रश्न – उतारा ऐकून प्रश्नांची उत्तरे देणे. (तोंडी)** (गुण ५)

**प्रश्नकर्त्यासाठी सूचना :**

- हा प्रश्न तोंडी असल्याने एकेका विद्यार्थ्याला जवळ बोलावून विचारायचा आहे.
- वर्गात जास्त मुले असल्यास दोन ते तीन दिवसात चाचणीचा हा भाग पूर्ण करता येईल.
- उतारा **वाचून दाखविण्याआधी** खालील सूचना मुलांना द्यावी, मग उतारा पूर्ण वाचून एक एक प्रश्न विचारावा.
- मुलाने उत्तर न दिल्यास किंवा उत्तर चुकल्यास उतारा **पुन्हा वाचा आणि प्रश्न** विचारा.
- त्यानंतर उत्तर चुकल्यास उतारा परत वाचू नये.

**प्रश्नकर्त्याने देण्याची सूचना :** आता मी तुला उतारा वाचून दाखवणार आहे तो नीट ऐक. वाचून झालं की मी तुला काही प्रश्न विचारणार आहे. त्याची तू उत्तरं द्यायची.

**उतारा :**

**आई आणि चार वर्षांची अनू बाजारात गेल्या. रस्त्यावर रहदारी होती. दोघीजणी चालल्या होत्या. एकदम अनूच्या लक्षात आले की, आई जवळपास दिसत नाही. आई हरवलेली दिसते? अनूचे डोळे इकडेतिकडे आईला शोधत होते. आई सापडेना.**

**अनूने डोळे मिटून देवाची प्रार्थना केली, ''देवबाप्पा, मला माझी हरवलेली आई सापडू दे.'' अनूने गच्च मिटलेले डोळे उघडले तर गर्दीतून धावत येणारी आई दिसली. अनूने आनंदाने आईच्या पायाला मिठी मारली?**

| | गुण | योग्य उत्तर |
|---|---|---|
| **तोंडी प्रश्न १) अनू व तिची आई कोठे गेल्या होत्या?**<br>अ) शाळेत ब) बाजारात क) देवळात | (१) | (ब) |
| **तोंडी प्रश्न २) अनूची आई का हरवली असेल असे तुला वाटते?**<br>अ) गाड्यांमुळे<br>ब) रहदारीमुळे<br>क) पावसामुळे | (२) | (ब) |
| **तोंडी प्रश्न ३) अनूने देवाकडे प्रार्थना का केली?** (हे तुझ्या शब्दात सांग.) | (२) | |



***Runa Graphics :*** *Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 2/Sanch-C/ Proof -II/19-06-2017/G*

**तोंडी प्रश्न ४) खालील उताऱ्याचे प्रकटवाचन करून घेणे.** (गुण ५)

**प्रश्नकर्त्यासाठी सूचना :**

- हा प्रश्न प्रकट वाचनाचे कौशल्य तपासण्यासाठी आहे.
- हा प्रश्न तोंडी असल्याने एकेका विद्यार्थ्याला जवळ बोलावून विचारायचा आहे.
- वर्गात जास्त मुले असल्यास दोन ते तीन दिवसात चाचणीचा हा भाग पूर्ण करता येईल.

**प्रश्नकर्त्याने देण्याची सूचना :**

मी तुला एक उतारा वाचायला देणार आहे. तो उतारा मोठ्या आवाजात वाच.

**उतारा :**

**एक होतं गाव. गावाबाहेर, दाट झाडीत होतं एक देऊळ. देवळात होते एक पुजारीकाका. पुजारीकाका जेवायला बसले आणि एकटे-एकटे जेवले असं कधी झालं नाही. काकांबरोबर जेवायला कधी चिमणी यायची तर कधी कावळा. कधी मोर तर कधी बगळा.**

**वाचनासाठी गुणदान :**

| गुण | निकष |
|---|---|
| ० | मुलाने उतारा वाचण्यात रस दाखवला नाही, मदत करूनही वाचता आले नाही. |
| १ | मदत करून काही शब्दांचे वाचन, वाचनातून वाक्याचा बोध नाही. |
| २ | मदत न करता शब्दांचे वाचन. वाचनातून वाक्याचा बोध नाही. |
| ३ | उताऱ्याचे प्रयत्नपूर्वक वाचन. आधी मनात वाचून मग प्रकट वाचन चालेल. वाचनातून वाक्याचा बोध होतो आहे. |
| ४ | काही वाक्यांचे स्वराघातासह प्रकट वाचन. |
| ५ | उताऱ्याचे स्वराघातासह प्रकट वाचन. गती महत्त्वाची नाही, वाक्यांचे परत वाचन चालेल. |

■■■



***Runa Graphics :*** *Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 2/Sanch-C/ Proof -II/19-06-2017/G*